**नि.दि.दा.क्र.२५/२०१७**
**नि.९७**
**सुर्यकांत वि. माधव व इतर**

**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ चा सरतपास शपथेवर श्री पियुष सायरे वकील साहेब यांच्यामार्फत सुरुः</u>**

१. आता मला माझे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.९७ देण्यात आले.

२. दस्त यादी नि.क्र.९६ सोबत मी अ.क्र.१ वर अधिकार अभिलेख पंजीची सत्य प्रत दाखल केली आहे. त्यास नि.क्र.९८ देण्यात येत आहे. अ.क्र.२ वर बक्षीस पत्राची नोंदणीकृत प्रत दाखल केली आहे. त्यास **<u>आर्टीकल अ</u>** देण्यात येत आहे. अ.क.३ वर श्रीरामराव व्यंकटराव यांना जानराव व्यंकटराव तरार यांनी पाठविलेल्या पत्राचा लिफाफा दाखल केला आहे. त्यास **<u>आर्टीकल ब</u>** देण्यात येत आहे. अ.क.४ वर श्रीरामराव व्यंकटराव यांना जानराव व्यंकटराव तरार यांनी पाठविलेल्या पत्र दाखल केला आहे. त्यास **<u>आर्टीकल क</u>** देण्यात येत आहे. अ.क.४ वर दैनिक नागपूर पत्रिका पान क्र. ४ व ५ ची प्रत दाखल केला आहे. त्यास **<u>आर्टीकल ड</u>** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास वादीतर्फे श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबः</u>**

तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत — समक्ष

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी
दिंनाकः३०/०७/२०२४

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी

**<u>उलटतपास वादीतर्फे श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबः</u>**

**३.** माझे शिक्षण बी.कॉम एम.बी.ए झाले आहे. हे म्हणणे खरे आहे कि, माझे शपथपत्रामध्ये माझे व्यवसायाबाबत उल्लेख नाही. दाव्यामध्ये एकूण १६ प्रतिवादी आहे. हे म्हणणे खरे आहे कि दाव्याच्या जबाबावर सर्व प्रतिवादी यांच्या सहया नाही. हे म्हणणे खरे आहे कि मी व माधवराव तरार यांचे शिवाय इतर प्रतिवादी प्रत्यक्ष न्यायालयात आले नाही. माझेकडे काही प्रतिवादीचे दाव्याकामी दिनेश रामराव तरार, रेखा यशवंत झटाले, रजनी चंद्रशेखर दयने, भारती हेंमत काथोटे, यांचे मूखत्यारपत्र आहे.

**४.** माझे आजोबांचे नाव व्यंकटराव लक्ष्मणराव तरार आहे. व्यंकटराव तरार यांना ५ मूले नामे, शामराव, रामराव, जानराव, रावसाहेब व अरविंद व मूली नामे विमल व कमल अशी अपत्ये होती. रामचंद्र तरार यांचे वडीलांचे नाव सिताराम होते. रामचंद्र तरार यांचे व्यंकटराव तरार यांचेसोबत सख्खे भावाचे नाते नाही. व्यंकटराव तरार सन १९४३ मध्ये मरण पावले. माझा जन्म सन १९४९ पूर्वीचा नाही. **साक्षदार हा वकीलांना उलट प्रश्न विचारुन उध्दट वर्तवणूक केली आहे न्यायालयाने त्यास ताकीद दिली असता उलट उत्तर देत आहे. करीता साक्षदाराचे वर्तवणूक नोंदविण्यात येते.**

**५.** सन १९४४ मध्ये शामराव व रामराव यांनी अन्नपूर्णा, जानराव, रावसाहेब अरंविंद व विमल आणि कमल यांना घराबाहेर काढले किंवा काय याची कल्पना मला नाही. सन १९४६ मध्ये माझे वडील व शामराव यांनी वाद मालमत्तेबद्दल अन्नपूर्णा, जानराव, रावसाहेब अरंविंद व विमल आणि कमल यांना पावती लिहून दिली होती हे मला माहीत आहे. साक्षदार स्वताहून सांगतो कि त्या पावतीमध्ये वाद मालमत्तेचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही कि जानराव यांनी १९४९ पूर्वी कर्ज घेउन वाद मिळकतमध्ये सूधारणा केली. सन १९४९ मध्ये वाद मिळकतीमध्ये पूर्ण तलाव होता. वाद जागेवरील तलाव मासेमारी करण्याकरीता ठेक्याने देत होते. साक्षदार स्वताहून सांगतो कि, रामचंद्र सिताराम तरार देत होते. जानराव हे ढिवर समजाचे लोंकाना मासेमारी करीता वाद जागेवरील तलाव ठेक्याने देत होते त्याबाबत वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेले ठेकापत्र मि पाहीले आहे. हे म्हणणे खरे नाही कि वाद जागेच्या उर्वरीत भागात धानाची शेती जानराव करीत होते. हे

म्हणणे खरे नाही कि वाद जागेवर जानरावचा पूर्वीपासून एकटयाचा कब्जा होता. हे म्हणणे खरे नाही कि त्याबाबतची महसूल अभिलेखावर नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे कि सूर्यकांत तरार यांचे साक्षचे वेळेस मी न्यायालयात हजर होतो. हे म्हणणे खरे आहे कि, नि क्र ६१ व नि क्र ६२ वर जमीन करण्यारेचे नाव म्हणून जानराव व्यंकटराव तरार यांची नोंद आहे. ज्या नोंदीबाबत मी तसेच ज्यांचे माझेकडे मूखत्यारपत्र आहे त्यांनी सक्षम अधिकाऱ्याकडे आक्षेप नोंदविला नाही. साक्षदार स्वताहून सांगतो कि, या दस्तांवर जानराव यांचा ०.४० या जागेवर जमीन करतो अशी नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे कि स्तंभ क्रमांक १० मध्ये जलसिंचीत क्षेत्र १.६० हेक्टर आर व स्तंभ ११ मध्ये अजल सिंचीत क्षेत्र १.३३ हेक्टर आर अशी नोंद आहे.

६. माझेकडे शेती आहे. सिंचीत, अजलसिंचीत शब्दाचा अर्थ मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे कि, वाद मिळकतीच्या प्रतिवादीचे ताब्यात आहे ही बाब जबाबाचे परीणामी दूरुस्तीमध्ये नमूद केली आहे. **साक्षदाराने न्यायानलयातील त्यांचे आजच्या वर्तवणूकीबाबत तोंडी क्षमा मागितली.**

पूढील उलटतपास वादीचे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी
दिंनाकः३०/०९/२०२४

समक्ष

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी

**<u>आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी उलटतपास वादीतर्फे श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबः</u>**

७. मला हे माहीत नाही कि, वादमालमत्तेचे लेखी वाटणी झाली होती किंवा काय. हे म्हणणे खरे आहे कि, वाद मालमत्तेच्या वाटणीबाबत नोटीस मी वादी यांना पाठवीली नाही तसेच दावा दाखल केला नाही. हे मी सांगू शकत नाही कि वाद मालमत्तेच्या ७/१२ उता–यावर वादी व इतरांची नावे चढवीतेवेळी त्यांना नोटीस दिल्या होत्या किंवा काय. वाद मिळकतीच्या ७/१२ उता–यावर प्रतिवादीचे नावाची फेरफार घेतेवेळी वादीची संमती होती किंवा काय हे सांगू शकत नाही. वादी वगळून वाद मालमत्तेवर इतरांची नावाची फेरफाराचा दस्त अभिलेखावर दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही कि, प्रतिवादी यांची नावे वाद मिळकतीच्या अभिलेखावर बेकायदेशीर नमूद करण्यात आले. हे मला माहीत नाही कि, वादीचे वडील जानराव यांनी प्रतिवादीचे नावे वाद मिळकतीच्या अभिलेखावरुन कमी करण्याबाबत वेळोवेळी अर्ज दिले होते किंवा काय. हे म्हणणे खरे नाही कि, रामचंद्र तरार यांचा रामराव, शामराव व जानराव यांचे सोबत रक्ताचे नाते नाही. बाजीराव यांना दोन मूले लक्ष्मणराव व सितराम होते. सिताराम यांना रामचंद्र हा मूलगा होता. लक्ष्मणराव यांना व्यंकटराव हा मूलगा होता. व्यंकटराव यास रामराव, जानराव, शामराव, अरविंद व रावसाहेब ही मूले होते.

८. रामचंद्र तरार यांचा वाद मालमत्तेमध्ये २/३ हिस्सा अधिकार अभिलेख सन १९५४ चे आधारे आहे. हे म्हणणे खरे आहे कि, एखादया मालमत्तेवर मालकी हक्क नोंद करण्याकरीता कायदेशीर दस्ताची आवश्यकता असते. नि.क्र. ९८ वर रामचंद्र, रामराव, शामराव , जानराव यांना १२८/१ मध्ये **कलम ५ फ** प्रमाणे हक्क मिळाल्याचे नमूद आहे. नि.क्र.९८ वर ज्या आदेशान्वे नावाची नोंदणी झाली त्या आदेशाची प्रत मी अभिलेखावर दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही कि, रामचंद्र, हे म्हणणे खरे रामराव, शामराव यांनी नोंदणी अधिका–यासोबत हातमिळवणी करुन खोटी नोंद घेतली त्या कारणाने मी आदेशाची प्रत दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही कि, प्रतिवादींचा वाद

मालमत्तेमध्ये कोणताही अधिकार नाही.

९. हे म्हणणे खरे आहे कि वादी रामचंद्र यांनी दिनांक १८/६/१९८८ रोजी तहसिलदार यांचे समक्ष वाद मालमत्तेबाबत अर्ज केल्याची माहीती मला आहे. सदर अर्ज वादीने अभिलेखावर दाखल केल्यानंतर सदर अर्ज वाचून मला माहीती झाली आहे. हे म्हणणे खरे नाही कि, सदर अर्ज वाद मालमत्तेची वाटणी व ताबा करीता केला होता. सदर अर्ज सर्वांनी आपआपला हिस्सा ताब्यात घ्यावा या करीता केला होता. हे म्हणणे खरे आहे कि सदर अर्जावर तहसिलदार पारशिवनी यांनी १७/९/१९९० रोजी आदेश पारीत करुन खारीज केला. साक्षदार स्वताहून सांगतो कि, तहसिलदार यांच्या न्यायकक्षेत येत नसलयाने खारीज केला. या आदेशा विरुध्द आम्ही किंवा रामचंद्रचे वारसांनी अपील दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे कि दिनांक १७/९/१९९० पासून आजपर्यंत रामचंद्रचे वारसांनी किंवा आम्ही कब्जा व वाटणीकरीता दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही कि, चूकीचे नोंदीचे आधारे वाद मिळकत बळकविण्याचा प्रयत्न आमचा आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे कि, मालमत्ता क्रमांक ४२५ बाबत चूकीची दूरुस्ती करीता दिनांक १०/८/२०१७ रोजी प्रतिज्ञापत्र तहसिलदार यांचेसमक्ष सादर केले होते. सदर प्रतिज्ञापत्राची प्रत मी अभिलेखावर दाखल करु शकतो. **उलटतपासा दरम्यान साक्षदार प्रतिवादी क्र.११ यांनी दस्त यादी क्र. ४ सोबत वादी यांनी दाखल केलेला दस्त अनूक्रंमाक १२ कबूल केला आहे. करीता त्यास नि.क्र.१०० देण्यात येते.** साक्षदार स्वताहून सांगतो कि, या दस्तावर सर्वे क्र ४२५ चे दस्त बघून मी सही केली तसेच वादी क्र. १ सूर्यकांत याने सूध्दा सही केली. हे म्हणणे खरे नाही कि, मालमत्ता क्र. ४२५ चा अभिलेख तयार करतांना चूकीचा तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही कि, ४२५ व ४३४ यांच्या नोंदी चूकीच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही कि, मालमत्ता क्रमांक ४३४ बळकवीण्याच्या उद्येशाने फक्त त्यापैकी मालमत्ता क्र. ४२५ मधील चूक दूरुस्त केली.

११. मी प्रत्यक्ष शेती करीत असल्याचा पूरावा अभिलेखावर सादर करु शकतो. मी पूर्वीपासून नागपूर येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे कि, नि.क्र.४० वरील माझे जबाबामध्ये वाद मिळकत प्रतिवादीचे ताब्यात आहे असे नमूद नाही. साक्षदार स्वताहून सांगतो कि,

परीनामी जबाबामध्ये केलेल्या दूरुस्तीमध्ये सदर बाब नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे कि वादी यांनी दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता व त्यावर प्रतिवादीने उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही कि,वाद मिळकत वरील ताब्याबाबतची माझ्या मूळ जबाबामधील कमतरता मी परीनामी जबाबातील दुरुस्ती मध्ये भरुन काढली. हे म्हणणे खरे नाही कि, वाद मिळकतीचे वादाबाबत तहसीलदारासमक्ष,मा. जिल्हा न्यायालयासमक्ष व मा. उच्च न्यायालयासमक्ष सादर केलेल्या माझे जबाबामध्ये वाद मिळकतीवरील ताबा बाबतचा उल्लेख नाही.हे म्हणणे खरे नाही कि मिळकतीचे वादाबाबत तहसीलदारासमक्ष,मा. जिल्हा न्यायालयासमक्ष व मा. उच्च न्यायालयासमक्ष सादर केलेल्या माझे जबाबामध्ये वाद मिळकतीवरील ताबा बाबतचा उल्लेख आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे कि, खोटी साक्ष देणे गून्हा आहे. हे म्हणणे खरे नाही कि, वाद मिळकतीमध्ये प्रतिवादीचा कधीच ताबा नव्हता.

**पूढील उलटतपास वादीचे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी
दिंनाकः२२/१०/२०२४

समक्ष

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी

**<u>आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी उलटतपास वादीतर्फे श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबः</u>**

१२. वाद मालमत्तेवर जात वहीवाट असले बाबत मी पटवारी किंवा तहसीलदार यांच्याकडून कोणतेही प्रमाणपत्र घेतले नाही. सर्वे क्र.१२८/१ ही शेत जमीन ९.२५ एकर होती. सर्वे क्र.४३४ पूर्वी ९.२५ एकर होती व आज रोजी ३.३३ हेक्टर आहे. मी सर्वे क्र.१२८/१ या शेत जमीनीचा क्रमांक आज रोजी सर्वे क्र. ४३४ झाल्याबाबत कोणताही दस्त अभीलेखावर दाखल केला नाही. वाद मालमत्तेचे वाटणीपत्र, हक्कसोडलेख, बक्षीसपत्र किंवा आपसी समझौतानामा या पैकी कोणतीही दस्त माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मालमत्तेसंबंधात वादी, वादीचे वडील व प्रतीवादी, प्रतीवादीचे वडील यांच्यामध्ये झालेला कोणताही दस्त अस्तित्वात नाही. अन्नपूर्णाबाई माझी आजी होती. हे म्हणणे खरे आहे की, अन्नपूर्णाबाईला तरार कुटुंबाची काही मालमत्ता मिळाली होती. मी अन्नपूर्णाबाईला मिळालेल्या मालमत्तेचा क्रमांक सांगू शकत नाही. परंतू आराजी ८ एकर होती. प्रतीवादींचे नाव वाद मालमत्तेच्या ७/१२ वर चढलेबाबत दस्त मी अभिलेखावर लावला आहे. प्रतीवादींचे नावाची नोंद वाद मालमत्तेच्या ७/१२ उताऱ्यावर घेते वेळेस वादींना नोटीस दिली होती या बाबत दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांना अंधारात ठेवून प्रतीवादींच्या नावाची नोंद महसूली दफ्तरी घेण्यात आली. हे मला माहित नाही की, रामचंद्र तरार यांच्या घरी अब्बास पटवारी राहत होते किंवा काय. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र तरार याच्या प्रभावाखाली अब्बास पटवारी यांच्याद्वारे प्रतीवादी यांच्या नावाच्या खोट्या नोंदी वाद मालमत्तेच्या बाबत झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, खोट्या नोंदीच्या आधारे प्रतीवादींच्या नावाच्या नोंदी वाद मालमत्तेबाबत घेण्यात आल्या. हे म्हणणे खरे नाही की, नरेंद्र जीनींग मालमत्तेचे वाद मालमत्तेसोबत काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मालमत्तेच्या अधिकाराबाबत माझ्याकडे कोणताही दस्त उपलब्ध नसल्याने नरेंद्र जीनींगच्या दस्ताचा उपयोग केला. दिनांक २५/०५/१९४९ रोजी झालेल्या वाटणीपत्राची झेरॉक्स प्रत

अभिलेखावर दाखल आहे. याबाबत मूळ प्रत वादीकडे असल्याकारणाने मी दाखल करु शकत नाही. सदर वाटणीपत्राची मूळ प्रत मागणी करणेकरिता कोणतेही पत्र वादीच पाठविले नाही. प्रकरण दाखल झाल्यापासून आज पर्यंत सदर वाटणीपत्र वादीने अभिलेखावर दाखल करावा याबाबत नोटीस दिली नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५/०५/१९४९ रोजीचे कोणतेही वाटणीपत्र अस्तीत्वात नसल्याने मी अभिलेखावर दाखल करु शकत नाही. हे मला माहीत नाही की, वादी, वादीचे वडील व प्रतीवादी, प्रतीवादीचे वडील यांच्यामध्ये वाद मालमत्तेबाबत लेखी वाटणीपत्र झाले होते किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील जीवंत असे पर्यंत त्यांनी वाद मालमत्तेबाबत वादी विरुध्द कोणताही आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना वाद मालमत्तेमध्ये कोणताही अधिकार नसल्याची जाणीव असल्याने त्यांनी आक्षेप नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सण १९४९ नंतर वादी व वादीच्या वडीलांनी वाद मालमत्तेमध्ये सुधारणा केली व वाद मालमत्तेची किंमत वाढल्याने वाद मालमत्ता बळकावण्याच्या उद्देशने अधिकार असल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतीवादींनी बेकायदेशीर रित्या वाद मालमत्तेवर आपले नाव नमूद करुन घेतले आहे. **नि.क्र. ६१ व ६२** वरील नोंदींना कधीही आव्हानीत केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र.८१** वरील तहसीलदार यांच्या आदेशाविरुध्द रामचंद्र तरार यांनी कोणतीही अपील केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.८१ वरील तहसीलदाराच्या आदेशा नंतर वाद मालमत्तेत वाटणी मिळणेबाबत नोटीस वादींना पाठविली नाही किंवा अर्ज तसेच दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व प्रतीवादींना त्यांच्या वाद मालमत्तेत अधिकार नसल्याची जाणीव होती, त्या कारणाने सण १९९० पासून आज पर्यंत कोणताही वाटणीचा दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व प्रतीवादी प्रत्यक्ष वाद मालमत्तेची वहीवाट करित नाही. हे म्हणणे खरे नाही की, लेखी जबाब व शपथेवरील पूराव्यातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नं.४२५ बाबत तहसील कार्यालय येथे सण २०१७ पासून प्रकरण सूरु झाले तेव्हा पासून

वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करण्यास सुरु केले. हे म्हणणे खरे नाही की, तहसील कार्यालयातील प्रकरण सुरु असतांना वादी सूर्यकांत यांना मी अश्लील शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. हे मला माहित नाही की, सूर्यकांत यांनी माझ्या विरुध्द पारशिवनी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली किंवा काय. हे म्हणणे खरे नाही की, तहसील कार्यालयातील प्रकरण सुरु झाले तेव्हा पासून वाद मालमत्ता बळकावण्याची लालच निर्माण झाली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतीवादींचा वाद मिळकतीमध्ये कोणताही अधिकार व संबंध नसतांना खोटा जबाब दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी

(जी.ओ. वानखडे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी

दिंनाकः ०४/०१/२०२५